# प्रादेशिक दरसूची २००९-१०

## १) सर्वसाधारण टिप्पणी

१. प्रादेशिक दरसूची २००९-१० मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. जाक्र लाक्षेवि/जसंवि/ता-७/प्रादसू/५२९२ दि.१६/१०/२००९ अन्वये मंजूर केली आहे व ती दिनांक १/७/२००९ पासून अंमलात आली आहे.

अ) साहित्याचे दर हे सर्व करासहित शासनाच्या प्रचलित नियमानुसार (व्हॅट, एक्साईज ड्यूटी इत्यादी) विचारात घेतले आहेत.

ब) गौण खनिजावरील स्मावित्व शुल्क हे महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रंमांक गौखनि-१०/०२०६/ प्रक्र ५७/ख दि. १५/१२/२००६ नुसार विचारात घेतले आहेत.

क) वाळूच्या दरात गौण खनिजावरील स्वामित्व शुल्क हे महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रंमांक गौखनि-१०/०२०६/ प्रक्र ५७/ख दि. १५/१२/२००६ नुसार विचारात घेतले आहे.

ड) सिंचन व्यवस्थापन व परिरक्षण व दुरुस्ती संबधित बाबींचे दर प्रादेशिक दरसुचीमध्ये समाविष्ट केले आहेत.

२. धरणांचे मुख्य विमोचक, पंप हाउस, इनटेक स्ट्रक्चर्स तसेच कालवा प्रणालीवरील (कालवा/शाखा/वितरीक/लघु वितरीका) मातीकाम व अस्तरीकरण, को.प.बंधारे इत्यादी कामासाठी जलसंपदा विभागाची दरसुची वापरण्यात यावी व इमारती, रस्ते, जलसेतू, सायफन, रस्ता पूल, जलझंपीशुंडीका (एस.डब्ल्यू.एफ.) ह्यूम पाईप ड्रेन, स्लॅब ड्रेन, सुपर पॅसेज, आऊटलेट, प्रपात, अतिवाही (एस्केप) इत्यादीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची दरसुची वापरण्यात यावी. त्या प्रकरणी अर्थातच खालील अनुक्रमांक १० ते १४ व १६ येथे मंजूर केलेल्या वाढी लागू होणार नाहीत.

३. ज्या उपसासिंचन योजनांच्या रायझींग मेनच्या एकूलत्या एक पाईपचा व्यास ६०० मि.मि. व त्यापेक्षा कमी असेल त्या उपसा सिंचन योजनांच्या सर्व बाबींसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याचे दर वापरावेत, इतर उपसासिंचन कामा मधील ज्या बाबींचे दर पाटबंधारे विभागाच्या दरसूचीत अंतर्भूत नाहीत त्या बाबींकरीताच परिसर अभियांत्रिकी विभागाचे दर वापरावेत व ज्या प्रकरणी परिसर अभियांत्रिकी खात्याचे दर वापरले जातील त्या प्रकरणी अर्थातच वरील अनुक्रमांक १० ते १४ व १६ येथे मंजूर केलेल्या वाढी लागू होणार नाहीत.

४. या दरसूचीत सर्व पूर्ण बाबींकरीता भरणे व उतरविणे याचे दर (जेथे बांधकाम साहित्याची वाहतूक १५० मी. पेक्षा अधीक आवश्यक आहे तेथे) मिळविण्यात आलेले नाहीत.

५. या प्रादेशिक दरसूचीत सिमेंटचा दर सर्व बाबींसाठी रु.२४१.०० प्रती पोते नजीकच्या सर्वात जवळील स्थानीक बाजारातून गृहीत धरलेला आहे. स्थानीक बाजारापासून ते प्रकल्प स्थळापर्यंतची सीमेंटची वहनावळ देय राहील. सदरील दरात सर्व करांचा समावेश आहे. दर तीन महिन्यांनी या सिमेंटच्या दराबाबत आढावा घेण्यात येऊन अधीक्षक अभियंता औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद हे तिमाहीकरीता सीमेंटचा दर घोषीत करतील त्याप्रमाणे अंदाजपत्रकासाठी दर घेण्यात यावा.

६. सर्व बांधकाम साहित्याचे दर खाणीवरील आहेत. अंदाजपत्रके तयार करतांना आवश्यकतेप्रमाणे वाहतुक खर्च समाविष्ट करावा.

७. सर्व बाबींसाठी पाण्याची प्रारंभिक वाहतुक एक कि.मी. आहे.

८. बांधकाम साहित्याच्या परिवहनाचे दर भरणे व उतरविणे च्या खर्चासह आहेत.

९. अ) सिमेंटच्या वाहतूक दरामध्ये सिमेंटची ट्रकमध्ये करावयाची चढ/उतार समाविष्ट नाही. सिमेंटच्या चढविणे उतरविणेच्या बाबतीत जेंव्हा हे काम कारखाना किंवा रेल्वे स्थानकातील असेल तेंव्हा हे काम अल्पवेळेच्या सूचनेनुसार व ठरवून दिलेल्या मुदतीत करण्याचे असल्याने त्यांचा भरणे व उतरविणे यांचा दर रु. ३५.८० प्रति मे.टन घ्यावा. इतर ठिकाणी या साहित्याच्या भरणे व उतरविणे यासाठी रुपये २१.५० प्रति मे.टन घ्यावा व त्यामध्ये संबंधीत वाहतुकीचे दर विचारात घ्यावे.

ब) पोलाद व ॲस्बेस्टॉस पत्रे यांच्या चढविणे उतरविणेच्या बाबतीत जेंव्हा हे काम कारखाना किंवा रेल्वे स्थानकातील असेल तेंव्हा हे काम अल्पवेळेच्या सूचनेनुसार व ठरवून दिलेल्या मुदतीत करण्याचे असल्याने त्यांचा भरणे व उतरविणे यांचा दर रु. ३५.८० प्रति मे.टन घेतला आहे. इतर ठिकाणी या साहित्याच्या भरणे व उतरविणे यासाठी रुपये २१.५० प्रति मे.टन घ्यावा व त्यामध्ये संबंधीत वाहतुकीचे दर विचारात घ्यावे.

१०. ०.१५ घनमीटर प्रती सेकंद व त्यापेक्षा कमी वहनक्षमता असलेले कालवे, उपकालवे, वितरिका, शेतचा-या यांच्या केवळ खोदकाम व भराव यासाठी २० टक्के जादा दर आकारावेत.

११. ०.१५ घनमीटर प्रती सेकंद व त्यापेक्षा जास्त परंतु १.०० घनमीटर प्रती सेकंद किंवा त्यापेक्षा कमी वहनक्षमता असलेले कालवे, उपकालवे, वितरिका, शेतचा-या यांच्या केवळ खोदकाम व भराव यासाठी १५ टक्के जादा दर आकारावेत.

१२. १.५ मी. पेक्षा कमी रुंदी असणा-या (उदा. लहान कालवे, वितरिका, शेतचा-या) सर्व प्रकारच्या खोदकामासाठी २५ टक्के जादा दर आकारावेत. मात्र वर अनुक्रमांक १० व ११ मध्ये नमूद केलेली २० टक्के वाढ किंवा १५ टक्के वाढ पुन्हा देय नाही. सदर वाढी २५ टक्के वाढीमध्ये समाविष्ठ आहेत.

१३. पुढील क्षेत्रासाठी ५ टक्के जादा दर आकारावेत.

१३.१) महानगरपालिकांच्या हद्दीपासून १० किलोमीटर अंतरापर्यंतचे क्षेत्र.

१३.२) साखर कारखान्यांच्या १० किलोमीटर पर्यंतचा परिसर.

१३.३) नगरपालिका क्षेत्र.

१३.४) औद्योगिक क्षेत्र.

१३.५) डोंगराळ क्षेत्र (नियोजन विभागाने घोषित केलेले)

१४. जनजाती क्षेत्रातील कामांसाठी १० टक्के जास्त दर आकारावेत.

१५. वरील अ.क्र. १३.१ ते १३.५ तसेच अ.क्र.१४ यापैकी अनेक कारणे लागू असली तरीही एकूण वाढ एकदाच देण्यात यावी. उदा. एखादे औद्योगिक क्षेत्र साखर कारखान्यांच्या १० किलोमीटर परिसरात असले तरी त्या क्षेत्रातील कामासाठी केवळ ५ टक्के जास्त दर आकारावेत. एखादे जनजाती क्षेत्र डोंगराळ म्हणूनही जाहिर झाले असेल तर एकूण वाढ १० टक्केच देण्यात यावी.

१६. आर्द्र स्थितीतील खोदाईकरीता, खोदकामाच्या बाब क्रमांक १ ते ६ चे दर २० टक्क्यांनी वाढवावेत.

१७. वरील अ.क्र.२ व ३ अन्वये ज्या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याच्या संबंधीत दरसूचीचे दर वापरले जातील त्या प्रकरणी अर्थातच अ.क्र.१० ते १६ येथे मंजूर केलेल्या वाढी लागू होणार नाहीत.

१८. या टिप्पणीत नमूद केलेल्या विशेष वाढी ट्रकने/टिप्परने करावयाच्या बांधकाम साहित्याच्या वाहतुकीच्या दरांना लागू आहेत.

१९. वरील अनुक्रमांक १६ येथील वाढ ही अनुक्रमांक १० किंवा ११ किंवा १२ व अनुक्रमांक १३ किंवा अनुक्रमांक १४ यांच्यासह लागू असलेल्या प्रकरणी स्वतंत्रपणे आकारता येईल. उदा. जनजाती क्षेत्रातील ०.१५ घनमीटर प्रती सेकंद क्षमतेच्या कालव्याच्या कामात आर्द्र स्थितीतील माती मधील खोदकाम करुन ५० मीटर अंतरावर नेऊन टाकण्याचा दर पुढीलप्रमाणे येईल.

| | | |
|---|---|---|
| मूळ दर | रु. २३.९० | |
| (+) ३५ मीटर अतिरिक्त वहन (५० मीटर - १५ मीटर मूळ दरात घेतलेले अंतर) | रु. ७.१२ | |
| | रु. ३१.०२ | ३५ मीटर अतिरिक्त वहन धरुन मूळ वाढीव दर |
| (+) आर्द्र स्थितीतील खोदकामासाठी २० टक्के अतिरिक्त वाढ (३१.०२ X ०.२०) | रु. ६.२० | |
| (+) ०.१५ घनमीटर प्रती सेकंद पेक्षा लहान कालव्यासाठी २० टक्के वाढ (३१.०२ X ०.२०) | रु. ६.२० | |
| (+) जनजाती क्षेत्रासाठी १० टक्के वाढ (३१.०२ X ०.१०) | रु. ३.१० | |
| | रु. ४६.५२ | |
| अंतिम दर | रु. ४६.५० घनमीटर | |

२०. जल निष्कासनाची अंदाजपत्रकीय तरतूद एकराशीय न करता आरोही अश्वशक्ती तास आधार घेवून करावी.

२१. अ) कालव्याच्या ज्या भागामध्ये खोदकाम करावयाचे आहे त्या भागामध्ये परिशिष्ठ-ख अंतर्गत बाब क्र. ४९ व ५० खाली वेगळा दर देण्याची आवश्यकता नाही.

ब) परिशिष्ठ-ख अंतर्गत बाब क्र. ४९ व ५० या खाली काम करावयाचे असल्यास कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष कामाचे निरिक्षण करुन त्यानंतरच सदरील बाबीखाली काम करुन घेण्यास मान्यता द्यावी. तसेच या बाबीखाली करावयाच्या कामाची अंदाजित रक्कम रु. २५,०००/- पेक्षा जास्त असल्यास अधीक्षक अभियंता यांचे पूर्व निरिक्षण आवश्यक आहे.

२२. कालव्याची कामे या उपशिर्षाखालील बाबींसाठी धन उत्थान दराच्या ५० टक्के ऋण उत्थान दर संपूर्ण उंचीसाठी देण्यात यावा.

२३. सरीतामापन केंद्राचे कामातील अडचणींचा विचार करता ३० टक्के जादा दर आकारावेत. मात्र अनुक्रमांक १३ व १४ मधील अनुक्रमे ५ टक्के व १० टक्के वाढ पुन:श्च देय नाही. सदर वाढ ३० टक्के जादा वाढीत समाविष्ठ आहे.

२४. सिमेंट व स्टील साठी दर विश्लेषणात इश्यु रेट (Issue rate) व प्रादेशिक दरसूचीमधील दर या मधील फरक विचारात घ्यावा.

२५. सर्व शीर्षाअंतर्गत बाबीसाठी गौण खनिजापोटी स्वामित्व धनाची रक्कम रू ३५.३४ प्रति घमी याप्रमाणे बाबवार दरामध्ये समाविष्ट करण्यात आली असून या दरामध्ये बदल झाल्यास प्रादेशिक दरसूचीमधील दरामध्येही अनुषंगिक बदल होतील.

२६. प्रादेशिक दरसूचीतील सर्वसाधारण टिप्पणी मधील १० ते १४ मधील विविध कारणास्तव दिलेल्या वाढी लागु करतांना बाबीचे दरामधुन स्वामीत्व शुल्क वगळून वाढी देण्यांत याव्यात.

२७. ई संधानक अंतर्गत बाब क्रं. २७, २८ व २९ या बॅचींग प्लॅन्टचा वापर संधानकात करणे बाबत आहे. सदर काम करीत असतांना या बाबीचे परिमाण १०,००० घ.मी. किंवा त्यापेक्षा जास्त असल्यासच या बाबीच्या अनुषंगाने अंदाजपत्रकात समावेश करण्यांत यावा. सदर परिमाणावरच बॅचींग प्लॅन्टचा वापर केलेवरच या बाबीचे प्रदान त्यानुषंगाने करण्यांत यावे.

२८. ख- कालवा अंतर्गत बाब क्र ५१ ते ५६ या बॅचींग प्लॅन्टचा वापर संधानकात अस्तरीकरण करणे बाबत आहे. सदर काम करीत असतांना या बाबीचे परिमाण १,००,००० चौ.मी. किंवा त्यापेक्षा जास्त असल्यासच या बाबीच्या अनुषंगाने अंदाजपत्रकात समावेश करण्यांत यावा. सदर परिमाणावरच बॅचींग प्लॅन्टचा वापर केलेवरच या बाबीचे प्रदान त्यानुषंगाने करण्यांत यावे.

२९. स्टीलच्या दरात सर्व करांचा समावेश असुन दर तीन महिन्यांनी स्टीलच्या दराबाबत शासन स्तरावर आढावा घेऊन शासन स्तरावरुन स्टीलचे दर प्रत्येक तिमाहीसाठी घोषीत करण्यांत येतील त्याप्रमाणे सर्वानां तसे कळविण्यांत येईल. त्याप्रमाणे अंदाजपत्रकासाठी स्टीलचे दर घेण्यांत यावेत.

३०. या टिप्पणीत नमूद केलेल्या विशेष वाढी ट्रकने टिप्परने करावयाच्या बांधकामा साहित्याच्या वाहतुकीच्या दरांना लागु आहेत.

३१. ज्या प्रकल्पांचे बांधकाम पूर्ण झाले आहे व जेथे सिंचन होत आहे अशा कालव्यांची दुरुस्तीची/ पुनर्स्थापनेची कामे यंत्रसामुग्री वापरुन (कालवा बंद कालावधीत) करतांना अतिरिक्त वाहतुकीसाठी ५ टक्के व प्रत्यक्ष कामासाठी कमी कालावधी उपलब्ध होत असल्याने विना काम राहणाऱ्या यंत्रसामुग्री/मनुष्यबळ म्हणून तदर्थ वाढ ५ टक्के अशी वाढ करावी. अतिरिक्त वाहतुकीसाठी ही वाढ परिवहनाचे दरात (Lead charges) ५ टक्के व विनाकाम राहणाऱ्या यंत्रसामुग्री/ मनुष्यबळ इत्यादीसाठी एकंदरीत पूर्ण अंदाजपत्रकीय बाबीच्या दरात (Completed item rate) ५ टक्के अशा प्रमाणे परिगणित करण्यात यावी. सदर वाढ सिंचन व्यवस्थापनाच्या सर्वसाधारण कामासाठी लागू राहणार नाही याची खात्री मुख्य अभियंता स्तरावर करणे बंधनकारक राहील.

३२. चंद्रपुर, गडचिरोली व यवतमाळ या जिल्हाशिवाय गोंदिया, भंडारा व नांदेड या जिल्याचा समावेश आता शासन परिपत्रक क्रमांक दरसूची २२०५/(२४६/२००५) लपा-२ दिनांक १३/९/२००६ अन्वये विशेष कृती कार्यक्रमांतर्गत करण्यात आला आहे. व त्यामुळे चंद्रपूर जिल्हयातील चंद्रपूर, गौडपिंपरी, राजूरा, कोपनना, बल्लारशा (बल्लारपूर) पोंभूर्णा, मूल व सावली, गडचिरोलीतील सर्व तालुके यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा, वणी व आर्णी, गोंदिया जिल्हयातील तिरोडा, गोरेगांव सडकअर्जूनी, सालेकसा, देवरी, अर्जूनी मोरगांव, गोंदिया व आमगांव (पोलीस स्टेशनचा भाग) भंडारा जिल्हयातील साकोली व लाखांदूर तसेच नांदेड जिल्हयातील किनवट या तालुक्यातील विशेष कृती कार्यक्रमांतर्गत सर्व कामांसाठी १० टक्के जास्त दर आकारावेत. हे १० टकके जास्त दर या क्षेत्रातील कामासाठी लागू असणाऱ्या इतर अतिरिक्त वाढीशिवाय जास्तीचे म्हणून समजावे.

३३. सिमेंटची रस्त्याने वाहतुक करण्यासाठी सामाईक दरसूचीतील वाहतुक दराप्रमाणे अंदाजपत्रक तयार करुन स्पर्धात्मक निविदा बोलवाव्यात व त्या सक्षम अधिकाऱ्यांनी मंजूर कराव्यात व त्या आधारे सिमेंट वाहतुक करण्यात यावी.

## २. खोदकाम व भराव काम

१. खोदकामातील सामुग्री १५ मी. अंतरापर्यंत व १.५ मी. उंचीपर्यत उत्थान करणे, तासणे ही कामे दरामध्ये समाविष्ट आहेत.

२. भराव कामाच्या दरात प्रारंभिक १५ मी. अंतरापर्यंत वाहतूक व १.५ मी. उंचीपर्यंत उत्थान करणे समाविष्ट आहे.

३. अंदाजपत्रक तयार करतांना १५ मी. पेक्षा अधिकची वाहतुक व १.५ मी. पेक्षा अधिकचे उत्थान करणे दरामध्ये मिळविणे आवश्यक आहे.

४. भरावकामासाठी डोई वाहतुकीची मर्यादा १५० मी. आहे. या मर्यादेपलीकडे ट्रकचे वाहतुक दर वापरावेत.

५. ज्या प्रकल्पावर मातीकाम अवजड यंत्रसामुग्रीव्दारे केले जाईल, तेथे स्वतंत्र दरपृथःकरण तयार करण्यांत यावे व त्यामध्ये उत्थान दर मिळवू नये. यंत्रसामुग्रीच्या प्रत्यक्ष वाहतुक मार्गानुसार वाहतुक दर ठरवावा. (शासन परिपत्रक क्र. दरसु-१०९५/९८/९५ लपा (२) दिनांक २९/२/९६ चे परिपत्रकानुसार कार्यवाही करावी.)

६. धरणाचे मातीकाम संपूर्ण उंचीसाठी जर डोई वाहतुकीने केले तर ऋण उत्थान दर धन उत्थान दराच्या ५० टक्के घेतला जावा.

७. खोदकामाच्या बाबीसाठी चालू देयके देतांना ३ टक्के कपात करुन आंशिक दर द्यावा आणि खोदकाम आवश्यक आकारात तासून झाल्यानंतरच अंतिम देयकात संपूर्ण दराची अदाई करावी.

८. आर्द्र स्थितीतील खोदाईकरीता खोदाईच्या बाब क्रं. १ ते ६ चे दर २० टक्क्यांनी वाढवावेत.

९. निर्बधित स्थिती असलेल्या उदा. जेथे माथ्याची/खोदाईची रुंदी १.५ मी. पेक्षा कमी आहे अशा खोदाई करीता सर्वसाधारण टिप्पणीतील बाब क्रमांक १२ व १५ नुसार दर घ्यावेत.

## ३. दगडी काम

१. बांधकामासाठी निरनिराळया प्रकारच्या कामावर बांधकाम मसाल्याची टक्केवारी खालीलप्रमाणे घेतली आहे

| | |
|---|---|
| अ) घडीव दगडी बांधकाम | पहिला दर्जा ३१ टक्के |
| ब) घडीव दगडी बांधकाम | दुय्यम दर्जा ३४ टक्के |
| क) स्तरहीन दगडी बांधकाम | |
| १) १ मी. पेक्षा कमी रुंद असलेल्या जलसंधारक संरचनेच्या भिंती आणि धरण व जलसंधारक संरचना या व्यतिरिक्त १ मी. पेक्षा अधिक रुंदीच्या संरचनेच्या भिंती | ३५ टक्के |
| २) १ मी. पर्यंत रुंदीच्या भिंती | ३० टक्के |
| ३) जलसंधारक संरचनेच्या भिंती व धरण | ४५ टक्के |

२. बांधकामाची कामे (बाबी) दर्जा भराई सोडून आहेत.

३. बांधकामाचे जास्त परिमाण असलेल्या धरणाच्या कामावर स्वतंत्र पृथःकरण करावे व अंदाजपत्रक तयार करावे.

४. १.५० मी पेक्षा अधिक उंचीच्या बांधकामात पुढील प्रत्येक १.५० मी. उंचीच्या कामासाठी

१९.००/- प्रती घ.मी. उचल दर मिळवावा.

५. सरासरी जमीन पातळीपासुन १.५० मी. खोलीपेक्षा अधिक खोलीवर असलेल्या बांधकामात पुढील प्रत्येक १.५० मी. खोलीसाठी बांधकाम दरात रु. ९.५० प्रति घ.मी. ऋण उचल दर मिळवावा.

६. बांधकामाच्या मंजूर दरामध्ये बांधकाम साहित्य ५० मी. च्या आत उपलब्ध आहे असे मानण्यात आले आहे.

## ४. वीटकाम

१. १.५० मी. उंची पेक्षा अधिक उंची असलेल्या बांधकामास पुढील प्रत्येक १.५० मी उंचीच्या कामाच्या दरात रु. १९.०० प्रति घमी उचल दर मिळवावा.

२. बांधकामाचे दर दर्जा भराई सोडून आहेत.

३. एक घमी बांधकामाकरिता ३१ टक्के बांधकाम मसाला वापरला जाईल असे गृहीत धरले आहे.

४. तळमजल्यावरील प्रत्येक मजल्यासाठी (तिस-या मजल्याच्या बांधकामापर्यंत) बांधकामाच्या दरात रु. १२.१५ घमी उचल दर मिळवावा.

## ५. काँक्रीटची कामे

१. सिमेंट आणि खडी यांच्या परिमाणाच्या बाबतीत दर ठरवितांना खालील गृहितके अनुसरली आहेत.

| अ.क्र. | खडीचा सर्वाधिक आकार | प्रमाण | अंदाजित सिमेंट पोते/घमी (फक्त मार्गदर्शनासाठी) |
|---|---|---|---|
| १ | ४० मी.मी. | म-१५० (१:२:४) | ५.२० |
| २ | ४० मी.मी. | म-१०० (१:३:६) | ४.४० |
| ३ | ४० मी.मी. | (१:५:१०) | २.८३ |
| ४ | ४० मी.मी. | म-७५ (१:४:८) | ३.४० |
| ५ | ४० मी.मी. | (१:६:१२) | २.३९ |
| ६ | २० मी.मी. | म-२०० | ८.०८ |
| ७ | २० मी.मी. | म-१५० (१:२:४) | ५.६४ |
| ८ | २० मी.मी. | म-१०० (१:३:६) | ४.४० |
| ९ | ४० ते ८० | म-१०० (१:३:६) | ४.४० |

२. प्रारंभिक उत्थान साध्या सिमेंट काँक्रीटसाठी १.५० मी. आहे आणि प्रबलीत सिमेंट काँक्रीटसाठी ३.०० मी. आहे. त्यापुढील प्रत्येक १.५० मी अधिकच्या उत्थानासाठी रुपये १९.०० प्रति घमी उत्थान दर मिळवावा.

३. धन उत्थान दराच्या ५० टक्के ऋण उत्थान दर काँक्रीटच्या संपूर्ण उंचीवर देण्यांत यावा.

४. मिश्रक व कंपित्र यंत्राचे दर मजूरीच्या दरात समाविष्ठ नाहीत.

## ६. वाहतुकीचे दर

ट्रकने/टिप्परने करावयाच्या बांधकाम साहित्याच्या परिवहनाचे दर या दरसूची पुस्तिकेत समाविष्ट आहेत त्यात दिलेल्या सूचनानुसार हे दर जसेच्या तसे घ्यावयाचे आहेत. सदर सूचना पुन्हा खाली उद्‌धृत केल्या आहेत.

अ) बांधकाम साहित्याच्या वाहतुकीच्या दरामध्ये चढविणे व उतरविण्याचे दर अंतर्भूत आहेत.

ब) वाळू/माती व मुरूम, खडी व डबर/टोळ यांचे वाहतुकीचे दर काढतांना फुगवटा विचारात घेण्यांत आला आहे. त्यामुळे फुगवटयासाठी कोणताही बदल करावयाचा नाही.

क) वरील दरामध्ये वरकड खर्च वाढवावयाचा नाही. तथापी सर्वसाधारण टिप्पणीतील अ.क्र. १८ प्रमाणे जास्तीचे दर देय आहेत.

ड) १०० कि.मी.च्या पुढील अंतरासाठी खालीलप्रमाणे वाढीव दर घ्यावेत.

१) पोलाद/नालीदार पत्रे, आर.सी.सी पाईप, शहाबाद फरशी व मॅक्सफाल्ट रु. १.७६ प्रति कि.मी. प्रति टन.

२) ॲस्बेस्टॉस, सिमेंट पत्रे, बल्ली/बांबू रु. ३.५२ प्रति कि.मी. प्रति टन

३) मंगलोरी कौले/विटा रु. ३.५२ प्रति कि.मी. प्रति १००० नग

४) लाकूड रु. १.७६ प्रति कि.मी. प्रति घ.मी.

५) पाणी प्रति कि.मी. प्रति १००० लिटर - मातीकामासाठी रु. १.६४/- बांधकामासाठी रु. १.७६/-

६) खडी, डबर,माती,मुरुम प्रति किमी प्रति घ.मी. - मातीकामासाठी रु. १.६४/- बांधकामासाठी रु. १.७६/-